LOK MAHAVIDYALAYA, WARDHA

DEPARTMENT OF LIBRARY SCIENCE

# M.Lib. Sem - IV



## Paper - II

# Information Analysis Repackaging & Consolidation

Que- माहिती म्हणजे काय? माहितीची व्याप्ती, संकलन आणि माहितीच्या प्रवाहाचे मार्ग स्पष्ट करा.

माहितीची निर्मिती आज वाढत्या प्रमाणावर असल्यामुळे त्या माहितीची गरज सुद्धा वाढलेली आहे. या बाबींचा समन्वय साधून कमीतकमी वेळात नेमकी माहिती उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरु असतात. या प्रकारचे कार्य करत असतांना काही तंत्रांचा उपयोग केला जातो. यामध्ये मनुष्य स्वतः कोणतरी विचार करित असतात आणि परिस्थितीचे, घटनांचे निरिक्षण करतात. आणि इतरांशी संपर्क साधून माहिती विषयक विचारांची देवाणघेवाण करित असतात. अशा प्रकारच्या संपर्कामधून ज्ञान निर्माण होते. ज्ञान म्हणजे सत्य परिस्थिती, घटना असा त्याचा अर्थ होतो. व्यक्ति किंवा वस्तु यांच्याशी आलेल्या संपर्कातून जे अनुभव येतात ते म्हणजे ज्ञान. एखाद्या गोष्टीचा अनुभव येणे किंवा सत्य माहिती होणे हि एक विशिष्ट मानसिक कृती आहे. ज्याला ज्ञान असे म्हटले जाते. म्हणजे ज्ञान, ज्ञान आणि ज्ञाता यांच्या समन्वयातून ज्ञानाची निर्मिती अधिक प्रमाणात होते. अशा ज्ञानाचा एक विशिष्ट घटक म्हणजे माहिती होय. कारण ज्ञान आणि माहिती या दोन्ही संज्ञा एकाच अर्थाने वापरल्या जातात.

माहिती आता प्रचंड प्रमाणात निर्माण झालेली आहे. या माहितीची व्यवस्था लावण्याकरिता स्वतंत्र एक माहिती शास्त्र या नावाने विषय प्रचारात आलेला आहे. माहितीची निर्मिती, व्यवस्थापन, वितरण व एकत्रिकरण या सर्व बाबींशी शास्त्राचा संबंध आहे. माहिती सहजपणे प्राप्त होवून तिची उपयुक्तता वाढवावी याकरिता काही प्रक्रिया कराव्या लागतात. माहिती केवळ साठवून न ठेवता उपयोक्त्यांपर्यंत पोहचविणे हे कार्य माहिती शास्त्र या विषयात, —

Data :-

संकलन आणि माहितीशास्त्र यांपैकी आणि ग्रंथालय

[illegible] यांचे UNESCO ने वेळोवेळी स्पष्टीकरण दिले आहे. तसेच Data या संज्ञेचे स्पष्टीकरण सुद्धा यामध्ये आहे. Data हे अनेकवचनी त्यानुसार मुळ Datum या संज्ञेचे रूप आहे. यामधून सत्य माहिती, संकल्पना आणि सूचना गठित करणे आणि संप्रेषणास उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने त्या माहितीची नोंद करणे. Data या संज्ञेचा उपयोग माहितीला समानार्थी असतो. माहिती प्रमाणेच Data वर सुद्धा प्रक्रिया करून नोंदी तयार करणे व उपयोक्त्यांसाठी किंवा संप्रेषणाकरिता ठेवला जातो. त्याला Process Data असे म्हटल्या जाते.

<u>माहिती</u> :- माहिती या संज्ञेची नेमकी व्याख्या करणे अवघड असल्यामुळे ती अनुभव निरिक्षण विचारांची देवाणघेवाण, लेखन आणि वाचन या बाबीमधून तयार होत असते. आज संशोधनाकरिता माहितीचा उपयोग हा वाढता आहे. त्यामुळे संशोधक त्यांच्या आवश्यकतेनुसार उपयुक्त माहिती संकलित करित असतात. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा संशोधन चालु आहे. तसेच नविन माहिती वेळोवेळी प्रसिद्ध केली जाते. यावरून

माहितीची व्याख्या :-

"उपयुक्त असलेले ज्ञान किंवा प्राप्त ज्ञान म्हणजे माहिती"

अशी सर्वसाधारणपणे व्याख्या करता येते, माहितीचे आतात संप्रेषण होणे आवश्यक असते. म्हणजेच त्यात नव्या माहितीबाबत माहिती मिळविणे, प्रत्यक्ष माहिती एकत्र करणे आणि संप्रेषण करणे याकरिता काही पद्धतींची आवश्यकता आहे. यामध्ये माहितीची निर्मिती, तीचा उपयोग या गोष्टीही महत्वाच्या आहे. फार वर्षापासून माहिती निर्माण करणे हि प्रक्रिया चालु आहे. व ती माहिती किंवा त्या माहितीच्या ज्ञानांना अनुभव यावा म्हणून प्रयत्न सुद्धा चालु असतात. माहिती मिळविणे म्हणजेच माहिती विषयक विशिष्ट हावभाव किंवा त्या माहिती विषयक घडणाऱ्या बाबी हे सुद्धा आवश्यक वाटू लागले. म्हणून माहितीच्या निर्मितीचा संचय, व्यवस्था व संग्रह प्रतिप्राप्त करणे आणि त्या माहितीचा प्रत्यक्ष उपयोग होणे या प्रक्रियाशी माहितीशास्त्र संबंधीत आहे.

माहितीशास्त्र हि संपूर्ण ज्ञानशाखा आहे. या शास्त्राच्या मदतीने माहितीची वैशिष्ट्ये आणि नवनविन माहिती याबाबत बोध घेतला जातो. काही सांकेतिक भाषा यामध्ये वापरल्या जातात. यावरून माहिती मिळविणे, तिचा संचय करणे, प्रतिप्राप्त करून देणे आणि माहितीचे प्रसारण करणे या माहितीशास्त्रातील प्रक्रिया आहे.

माहितीची व्याप्ती :-

उपयुक्त माहिती एकत्रित करून तीची व्यवस्था करणे माहिती उपयुक्त असेल तरी ती जशीच्यातशी वापरता येत नाही. तर त्यावर काही विशिष्ट प्रक्रिया कराव्या लागतात. माहिती हि कमितकमी वेळात वाचकांना उपयुक्त म्हणून उपलब्ध होईल अशी सोय करणे. उपयोजकांना किंवा गरजू वाचकांना प्रत्यक्षपणे माहिती पुरवणे यावरून असे सांगता येईल की, हे एक स्वतंत्र शास्त्र असले तरी इतर शास्त्राच्या अभ्यास पद्धति आणि तंत्रे यांच्या सहाय्याने या शास्त्राची वैशिष्ट्ये जाणुन घेता येतात.

<u>वैशिष्ट्ये</u> :-

1) शास्त्राची स्वतंत्र तत्त्वे आहेत.
2) ते पाळण्याकरिता काही विशिष्ट तंत्रे आहेत
3) माहिती जमविणे, संचय करून संग्रह करणे ती उपलब्ध होण्याकरिता काही पद्धती आहेत. यामध्ये माहिती विषयक गुणधर्म सुद्धा विचारात घेतले जातात.
4) माहितीच्या शास्त्राशी संबंध असतो. म्हणुन माहितीची निर्मिती माहितीजालात आगमना याबाबतचे स्पष्टीकरण सुद्धा द्यावे लागते

5) माहिती हि सतत प्रवाहित होत असते म्हणजेच ती एका जागी स्थिर राहत नाही आणि निर्मात्यांपासून अनेक माध्यमांच्या द्वारे उपयोक्त्यांपर्यंत प्रसारित होते. आणि पुन्हा त्या माहितीची नव्याने निर्मिती होते.

6) माहितीच्या प्रवाहाबाबत स्पष्ट स्पष्टीकरण दिलेले आहे.

माहितीच्या प्रवाहाचे मार्ग –

कोणत्याही क्षेत्रात नवीन माहिती होणे आणि उपयोजकांपर्यंत नव्या संशोधनाकरिता पोहचने यामध्ये नेमके किती अंतर आहे आणि हे अंतर कसे कमी करावे याची जाणीव मलेय्यन यांच्यामुळे झाली. माहितीच्या निर्मात्यांकडून माहितीचा प्रवाह हा आपोआप पोहचत नाही त्याकरिता माहितीच्या संभाव्य उपयोजकांना माहितीच्या निर्मात्यांना कशाबद्दल माहिती प्रकाशित करीत आहेत हे माहित असावे लागते. माहितीच्या निर्मात्यांनी उपयोजकांच्या गरजाबाबत जागरूक असावे यामध्ये माहिती प्रवाहित होण्याचे तीन मार्ग आहेत. –

1) मौखिक 2) दृश्य 3) सलेख्य

1) मौखिक – व्याख्याने, चर्चासत्रे, बैठकी.

2) दृश्य – निर्मिती, प्रदर्शने, प्रात्यक्षे, आकृत्या, आलेख.

3) सलेख्य – निर्माता, प्रकाशक, वितरक, व्यावसायिक संस्था, ग्रंथालय, इतर ग्रंथालये.

माहिती संप्रेषण –

माहिती हि मानवाची निर्मिती असल्यामुळे त्यात अनुभव, निरिक्षण, विचारांची देवाणघेवाण व प्रयोगाचे वाचन यामधून निर्माण झालेले माहितीचे प्रवाह संप्रेषित होत असतात. संशोधनामध्ये माहितीच्या संप्रेषणाच्या मुक्तपणे प्रवाह महत्त्वाच्या असतो. संशोधने जुन्या माहितीवरच आधारित असल्यामुळे माहिती योग्य वेळी पोहचणे जरुरी असते. माहिती या शब्दाचा वापर माहिती शास्त्रात संलेखक करीत असतात. तेव्हा ग्रंथसूचीय माहिती असा त्याचा अर्थ होतो. असा प्रकारचे मत जे. जि. ओले यांनी व्यक्त केले आहे. संशोधनावर उपयुक्त अशी माहिती जमवून त्या माहितीची योग्य रचना करून ती साठविली जाते. त्या माहितीतून ठराविक माहितीचा शोध घेण्याविषयी काही पद्धती तयार केल्या आहे या संकल्पनेला माहितीची पुनर्प्राप्ती किंवा पुनःप्राप्ती म्हटल्या जाते. पुनर्प्राप्ती या शब्दाचा अर्थ हरवलेली गोष्ट प्राप्त करणे किंवा परत मिळविणे असा आहे. परंतु माहितीच्या बाबतीत आवश्यक माहिती आहे अशाप्रकारे साहित्य शोधने असा त्याचा अर्थ होतो. जे. एच. शेरा यांनी विषयक माहिती शोधण्याची एक हि प्रक्रिया आहे असे म्हटले माहिती शोधण्याच्या अनेक प्रक्रियेची अनेक रूपे अस्तित्वात आहे Hidalr यांनी माहितीचा संचय, माहितीची प्राप्ति याकरिता काही टप्पे सुचविलेली आहे. –

i) ग्रंथालय साहित्यातील माहितीची नोंद करणे.

ii) त्या माहितीचा संचय करणे.

iii) उपयोक्त्यांकडून मागणी आलेल्या संबंधीत साहित्याचा शोध घेणे.

iv) संचय केलेल्या माहितीतून योग्य साहित्य काढून देणे.

त्यापुढे सुधारित आणि चांगल्या रचनेमुळे माहिती शोधण्याचे कार्य सहजरीत्या झालेले आहे. माहिती हि अधिक वेगाने शोधल्या जावू लागली कारण, माहितीचा संचय आणि प्राप्ती या दोन्ही बाबी सातत्याने चालणाऱ्या माहिती संप्रेषणाचा एक भाग आहे. माहितीविषयक मागणी करणाऱ्याचे चार प्रकारे दृष्टिकोन

जाऊ शकतात. त्यामध्ये प्रचलित दृष्टीकोन असणाऱ्यांकरिता प्रचलित माहिती सेवा आहे.

## प्रचलित माहिती सेवा :-

उपयोक्ते किंवा संशोधक किंवा गरजु वाचक यांच्या करिता माहिती जमा करण्याचे अनेक प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मार्ग आहेत.

i) लेखकांना त्यांच्या सहकाऱ्यांशी केलेल्या चर्चेतुन किंवा संशोधकांना एकमेकांशी केलेल्या चर्चेतुन माहिती मिळते.
ii) संबंधीत विक्रेत्यांकडून सुचना व्यावहारिक संभाषणे यातुन सुद्धा माहिती मिळते.
iii) प्रसिद्धिस न आलेले किंवा पुनरमुद्रीत प्रलेख वाचल्याने माहिती प्राप्त होते.
iv) सभा, संमेलने, चर्चासत्रे यामध्ये प्रत्यक्ष हजर राहिल्यानंतर औपचारिक, अनौपचारिक मार्गाने माहिती मिळते.
v) वाङ्मयिन साहित्य सुद्धा उपयोगी पडते.

अनौपचारिक मार्गाचा जास्त वापर या सेवेत उपयोग होतो. म्हणुन प्रचलित माहिती पुरविण्याचे काही औपचारिक मार्ग सुद्धा उपयोगात आणावे लागतात.

## 1) दैनंदिन दृष्टीकोन :-

रोज उपयोगाकरिता अल्पावधीत तात्कालिक स्वरूपाच्या माहितीची आवश्यकता असते आणि ती माहिती वस्तुनिष्ठ असल्यामुळे संशोधक संशोधन करित असतांना किंवा काही प्रयोग चालु असतांना वारंवार लहान-लहान माहितीची किंवा माहितीपूर्ण उत्तरांची गरज असते. अशा माहितीसाठी मोठे लेख उपयोगी पडत नाहीत. कारण, माहिती ही नेहमीच हवी असते. तेव्हा ती थोड्या वेळात देता येईल अशाप्रकारची काही योजना तयार करूनच उपयोक्त्यांना संप्रेषित करावे लागते. काही देशामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या आकडेवारी एकत्र करून ठेवल्यास सोयीचे जाते. परंतु मोठमोठ्या पुस्तकांच्या स्वरूपात प्रसिद्ध होणाऱ्या आकडेवाऱ्या आणि माहिती ही जुनी होते. तेव्हा त्यांच्या नविन आवृत्त्या मिळवाव्या लागतात आणि म... अद्ययावत असल्याची खात्री करून घेतल्या जाते. अशाप्रकारे... आणि जुन्या माहितीचा एकत्रीत संग्रह करून तिचे जतन क... करिता Databanks ची संकल्पना अस्तित्वात आली. ... यंत्रांच्या सहाय्याने पाहिजे तेव्हा आवश्यक माहिती जमवून... येते आणि ती दैनंदिन दृष्टीकोनातून मागणी आल्यानंतर प्र... करण्यात येते.

## व्यापक दृष्टीकोन :-

कित्येकदा संशोधकांना ठराविक विषया... उपलब्ध असेल अशी माहिती हवी असते. त्याला संशोधन ... पुर्वी संबंधीत विषयावर काही कार्य झालेले आहे काय? म्हण... कुणी संशोधन केलेले आहे का? अशाप्रकारची माहिती हवी ... प्रकल्प हाती घेतांना किंवा त्याविषयक माहिती लिहतांना ... माहितीची गरज असते कि जी व्यापक स्वरूपात असेल त्याकरि... माहिती गोळा करित असतांनाच जास्तीतजास्त व्यापक स्वरूपा... करावी लागते. त्याकरिता काही सर्वांग योजना जरूरी आहे. ... प्रकारच्या व्यापक दृष्टीकोनाची संशोधकास फार मोठी जाणी... झाली आहे म्हणुन विषयसुची, सारलेखन, निर्देशन या सेवां... उपयोग होवु लागला यांच्या सहाय्याने अभ्यासक नेमक्या माहि... पर्यंत पोहचतात त्यांना मुळ प्रलेख मिळवणे सोपी जाते परंतु मु... प्रलेखांची संख्या सुद्धा प्रचंड प्रमाणावर झाल्यामुळे नेमकी ... आणि संबंधित माहिती शोधणे कठिण जाते. म्हणुन सारलेखन... निर्देशन अशा द्वितीय स्वरूपातील प्रलेखाची मदत घेवुनच मु... प्रलेखाची माहिती शोधावी लागते. पाहिजे असलेला प्रलेख ... समजा माहितीकेंद्रात नसेल तर तो ग्रंथालयांच्या सहाय्याने ... कोणत्या माहिती केंद्रात असेल ते शोधावे लागते. शिवाय ... ग्रंथालयीन देवाणघेवाण स्वरूपात तो प्राप्त करावा लागतो. अ... प्रकारे प्रचलित माहिती बाबत व्यापक दृष्टीकोन असल्यास कोणत्या... स्वरूपातील माहिती प्रलेख संशोधकास उपलब्ध करून देणे महत्त्वा... ठरते.

## उजळणी दृष्टीकोन -

एखादा अभ्यासक किंवा संशोधक काही काळाकरिता आपल्या क्षेत्रापासून किंवा अभ्यासापासून दूर गेलेला असेल आणि नंतर पुन्हा संशोधनास सुरुवात करीत असल्यास त्या मधल्या काळातील बदल झालेल्या किंवा विकास झालेल्या माहितीची तो मागणी करतो. अशावेळी त्याच्या माहितीबाबतचा दृष्टीकोन उजळणी दृष्टीकोन असतो. त्यावेळी विषयाचे अहवाल, काही प्रकाशने त्यास उपयोगी पडतात. त्यातून विशिष्ट काळातील संबंधीत विषयाच्या विकासाची एकत्रित स्वरूपात माहिती मिळते. पण त्या माहिती व्यापक स्वरूपात असते. परंतु प्रत्येक लेख वा नवीन माहिती विषयीचा उल्लेख घेऊन लहान-लहान स्वरूपात प्रसिद्धीस आलेला असतो. म्हणून एखाद्या विषयाचा आढावा किंवा परिक्षण करीत असेल तर त्यांनी विकासात्मक माहिती मिळू शकते आणि संबंधीत माहिती विषयतज्ञ देऊ शकतात. अशाप्रकारची माहिती वाचूनही पूर्ण करावी लागते. अशातऱ्हेने विषयातील विशिष्ट काळातील माहिती मिळवून त्याचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी हा उजळणी दृष्टीकोन महत्वाचा ठरतो.

## प्रचलित दृष्टीकोन :-

एखाद्या विषयाची विशिष्ट प्रकारची माहिती सांगितल्या जाणार असे नाही. तर संबंधीत विषयाचे आधुनिक प्रकारचे ज्ञान, नवनवीन तंत्रे, प्रभावी माध्यमे नियमितपणे मिळावी असे संशोधकांचे दृष्टीकोन असतात. म्हणजे अद्ययावत माहिती त्वरित कमीतकमी वेळात मिळणे याला प्रचलित दृष्टीकोन म्हणतात. संशोधक अभ्यास करीत असलेल्या विषयावर नवीन प्रकारची काही माहिती प्रसिद्ध झाली आहे का आणि त्या प्रकारची माहिती मिळवणे हे संशोधकांना महत्वाचे असते. वाचकांची अशा प्रकारची गरज तात्पुरती किंवा विशिष्ट नसते. त्याकरीता लेखन कार्य सतत चालु असते. अशा कार्यासाठी पूर्वनियोजीत पद्धती ठरवावी लागत नाही.

नवनवीन तंत्रे प्रभावी माध्यमे नियमितपणे मिळावी असे संशोधकांचे दृष्टीकोन असतात. म्हणजे अद्ययावत माहिती त्वरित कमीतकमी वेळात मिळणे याला प्रचलित दृष्टीकोन असे म्हणतात. संशोधक अभ्यास करीत असलेल्या विषयावर नवीन प्रकारची काही माहिती प्रसिद्ध झाली आहे का आणि त्या प्रकारची माहिती मिळवणे हे संशोधकांना महत्वाचे असते. वाचकांची अशा प्रकारची गरज तात्पुरती किंवा विशिष्ट नसते. त्याकरिता लेखन कार्य सतत चालु असते. अशाप्रकारच्या कार्यासाठी काही वेगळी किंवा पूर्वनियोजित पद्धती ठरवावी लागत नाही. यामध्ये मुख्य सांगता येईल की संशोधकांचे अभ्यासाचे निष्कर्ष कोणत्याही ध्यान असले तरी त्यांच्या विषयावर नियमितपणे मागणी होणार असे ग्राह्य धरावे लागते. तिसरी बाब अशी म्हणता येईल की, प्रत्येक वेळी प्राथमिक प्रकारचा उल्लेख किंवा उत्पादन माहिती आवश्यक असेल असे नाही. तर त्यामध्ये विशिष्ट माहिती प्रकाशित झाली किंवा सर्वांचे त्या विषयावर कार्य चालु आहे किंवा एखादा प्रकल्प आणि त्याबरोबरचे निष्कर्ष प्रसिद्ध होणार असेल असे संदर्भ माहिती वापर करतांना नोंदविल्या जातात. आणि आवश्यकता वाटल्यास ते ग्रंथनिर्देश केल्या जातात. परंतु माहितीची खरेदी आणि उपयोजक यांच्यामध्ये सतत माहितीचे संप्रेषण चालु असते. अशाप्रकारच्या दृष्टीकोनाकरिता माहिती पुरविण्याची सेवा म्हणजे प्रचलित जागरूकता सेवा. कुठल्याही माहिती साठीच प्रचलित माहिती पुरवून संशोधकांना जागरूक ठेवता येते.

## प्रचलित जागरूकता सेवेची वैशिष्ट्ये :-

1) लिखित स्वरूपात प्रसिद्ध होणाऱ्या माहितीची लेखी स्वरूपात माहिती देणारी हि यंत्रणा असते.

2) प्रचलित दृष्टीकोन विचारात घेऊनच मागणी विषयक माहिती सेवा पुरविल्या जाते.

3) नेमक्या कोणत्या प्रकारच्या माहितीच्या चौकशीला उत्तर म्हणून हि सेवा असते तर संबंधीत विषयावरील प्रचलित विकासाचा

आठव) ठेवण्याकरिता असते.

4) निवडक आणि उपयुक्त प्रलेखांची प्रचलित जागरूकता यादी माहितीचा विकास ठेवण्याकरीता उपयुक्त ठरते.

5) ही सेवा व्यापक विषयांबाबत असते. त्यामुळे विषयांबरोबर संबंधीत विषयांवरील माहिती सुद्धा संशोधकांना मिळू शकते आणि ती माहिती संशोधकाच्या विकासावरील संशोधनास प्रभावी ठरू शकते.

6) ज्या संशोधकास वैयक्तिक प्रयत्नातून नविन माहिती मिळू शकत नाही त्यांच्यासाठी आवर्जून या सेवेचा उपयोग केला जातो.

7) नविन माहिती देण्याचा हा गतिमान व औपचारिक मार्ग आहे.

8) या प्रकारच्या सेवेच्या वेगळ्या स्वरूपामुळे प्रचलित माहिती देणारे सर्वप्रकारचे प्रलेख वाचले म्हणजे त्याबाबत अभ्यास केला अशी संशोधकाची खात्री होते.

→ वरील प्रचलित जागरूकता सेवेची वैशिष्ट्ये आणि त्याबाबत काही व्याख्या पुढीलप्रकारे ;-

1. विशिष्ट वाचकांच्या गरजेच्या किंवा त्यांच्या संशोधन विषयाचा विचार न करता ठराविक कालावधी प्रसिद्ध झालेल्या नियतकालीकांची त्यातील लेखांची माहिती प्रसिद्ध करणे. म्हणजे प्रचलित जागरूकता सेवा होय. असे डॉ. रंगनाथन यांनी म्हटलेले आहे. यामध्ये विशिष्ट प्रकारचा दृष्टीकोन नसुन सामान्य दृष्टीकोन असतो. संशोधकास संबंधीत विषयावरील नविन आणि सुक्ष्म विचारांबाबत जागरूक ठेवले जातात.

Allen Kent :- [अल्पकालीन आणि दिर्घकालीन महत्त्व असलेल्या प्रश्नांविषयी माहिती नविनतम स्वरूपात आणि अद्ययावत अशा साहित्य साधनातून शोधने आणि सादर करणे हि शास्त्रशुद्ध कल्पना आहे]

याकरिता काही मार्ग निरनिराळ्या माहिती केंद्रामधून अवलंबिले जातात.

① प्रचलित जागरूकता यादी
   1) वर्गिकृत याद्या
   2) विभागानुसार याद्या
   3) अनुवर्णानुसार याद्या
   4) कालक्रमानुसार याद्या.

② प्रचलित अनुक्रमणिका याद्या
③ प्रचलित नियतकालीकांचे प्रसारण
④ निवडक माहितीचे प्रसारण.
⑤ प्रगती पथावरील संशोधने.
⑥ सभा परिषदा यांची माहिती
⑦ वर्तमानपत्रातील माहिती कात्रणाच्या स्वरूपात जमविले.

## निवडक माहितीचे प्रसारण

माहिती केंद्रात एकत्रित केलेल्या सर्व माहितीचे प्रसारण न करता त्यावर काही मर्यादा घालाव्या लागतात. म्हणजेच प्रचलित जागरूकता सेवेचा एक भाग म्हटल्या जाते. एकत्रित केलेली माहिती उपयुक्त असते परंतु त्यातील काही अधिक महत्वाची असते. अशा माहितीची निवड करणे गरजेचे असल्यामुळे विशेष संशोधकास प्रचलित यादीतून माहिती शोधने हे अशक्य असते. म्हणुन निवडक सेवा आवश्यक आहे. माहितीचा सतत परिस्फोट होत असतो. प्रचलित माहितीच्या याद्या सुद्धा मोठ्या प्रमाणात असतात. यातून हवी असलेली माहिती शोधण्याकरिता वेळ लागतो. म्हणुन निवडक माहितीचे प्रसारण करणे हे आवश्यक असते. संशोधकांच्या अशा व्यक्तिगत गरजा लक्षात घेऊन हि सेवा सुरु केली. H. P. Luhan यांनी 1958 मध्ये यांत्रिक स्वरूपात या सेवेचा प्रारंभ केला. आणि त्यांचा उद्देश व्यावसायिकपणे संगणक तयार करणे आणि त्याची उपयुक्तता पटविणे हा होता. आणि त्याद्वारे निवडक माहिती गोळा करून उपलब्ध करून देण्याची योजना तयार केली आणि 1959 पासून

हिचा पुर्णपणे उपयोग होवू लागला.

वैशिष्ट्ये

1) संशोधकास दिल्या जाणाऱ्या वैयक्तिक अशा सेवा यामध्ये समाविष्ट आहे. त्या एका विशिष्ट उपयोक्त्याला किंवा संबंधीत विषयाच्या संशोधन गटास दिल्या जातात.

2) उपयोक्त्यांच्या गरजा जाणुन दिली जाणारी हि उपयोजक सेवा आहे.

3) सारलेखन, निर्देशन यामध्ये समाविष्ट होण्याआधी नविन माहिती जलदगतीने मिळवुन देणारी ही सेवा होय.

4) वाचकांना माहिती दिल्यानंतर त्यामध्ये निवडीची गरज नसते कारण दिली गेलेली माहिती आधीच निवडक किंवा नेमकी अशा स्वरुपाची असते.

5) संगणकाच्या सहाय्याने किंवा त्या व्यतिरिक्त सुध्दा हि सेवा देता येते. परंतु हे एक काम असुन एका कार्यानंतर दुसरे कार्य करण्याचा किंवा करित रहाण्याचा कार्यप्रवाह होय.

## निवडक माहिती प्रसारणातील टप्पे :-

1) माहिती केंद्रात किंवा ग्रंथालयात सर्वच प्रकारचे प्रलेख किंवा ग्रंथ किंवा इतर वाचन साहित्य असतात. त्याची अनुक्रमणिका पाहून निवडक लेखांचे विश्लेषण करावे लागते. आणि यासाठी येणारा प्रत्येक लेख निश्चितपणे उपयुक्तच आहे याची खात्री केल्या जाते.

2) उपयुक्त प्रलेखांचा निर्देश तयार केला जातो. त्यात महत्वाच्या संज्ञा निश्चित कराव्या लागतात. त्यातील समान संज्ञा निवडून प्रलेखांच्या नोंदी करुन प्रलेख निर्देश करावा लागतो.

3) निर्देशांची रचना एकत्रित करुन प्रलेख निर्देश file तयार केल्या जाते.

4) अशावेळी उपयोजकांच्या गरजांचीही नोंद ठेवली जाते कोणत्या व्यक्तिला किंवा गटाला माहिती गोळा करण्याकरिता एक निश्चित आराखडा दिला जातो. वाचकांचे संशोधन कोणत्या विषयावर कोणत्या दृष्टीकोनातून चालु आहे याची पूर्ण आणि अद्ययावत माहिती असावी लागते.

5) माहिती मिळविण्याकरिता संबंधित विषयाचा पर्यायी शब्दकोश वापरला जातो. अशाप्रकारच्या वैयक्तिक नोंदी एकत्री करुन व्यवस्थित लावणे महत्वाचे आहे. याशिवाय निवडक से[वा] देता येणार नाही.

6) प्रलेखातील निर्देश नोंदी आणि उपयोजकांच्या गरजा या दोन्हीतील सारख्या आणि महत्वाच्या संज्ञा संगणकाच्या सहाय्या[ने] पडताळून पाहता येतात. या दोन्हीमध्ये सारख्या किंवा जवळच्या संज्ञा आढळल्या तर त्याची माहिती सविस्तरपणे नोंदविता येते.

7) वाचकास उपयुक्त प्रलेख निश्चित झाला म्हणजे त्याची नोंद उपयोजकाच्या गरजांच्या फाईल मध्ये केल्या जाते. हि नोंद पाहून प्रलेखाबद्दलची सुचना उपयोक्त्यांना मिळते. गरज[े]नुसार माहितीचे सार किंवा प्रलेख विषयक ज्ञान किंवा मुळ प्रलेख वाचकांकडे पाठविल्या जातो.

8) उपयोक्ते अशाप्रकारच्या सुचना किंवा तत्पद माहिती पाहू[न] काही प्रतिसाद देवू शकतात. त्याकरिता ते आपली माहितीविषयक गरज आणि प्राप्त झालेली माहिती पडताळुन पाहतात. आणि आप[ल्या] संशोधनात प्राप्त माहितीचा उपयोग किती प्रमाणात होईल ते ठरवितात.

9) उपयोजकांकडून अशाप्रकारच्या सेवेबाबत प्रतिसाद मिळव[ण्]याकरिता यांत्रिक योजना सुध्दा करता येते. माहिती विषयक सुचना किंवा माहिती यासोबत इत्यादी छापील स्वरुपात चिठ्ठी किंवा प

दिल्या जाते आणि पाठविलेल्या माहितीच्या उपयोगाबाबत विचारणा केल्या जाते.

10) यावरुन वाचकांना दिलेल्या माहितीचा उपयोग होतो आहे किंवा नाही हे कळते. आणि माहिती विषयक आणखी वाचकांना घालेल, कि मूळ लेख द्यावा लागेल हे सुद्धा कळते. अशाप्रकारे माहिती हि जास्त प्रमाणात उपयुक्त ठरली तर निवडक सेवा हि उत्कृष्टरित्या दिल्या गेली आहे याबाबत प्रसारकास अंदाज येतो.

11) माहिती जर वाचकांना उपयुक्त नसेल तर पुन्हा निर्देश विषयक नोंदी पडताळून पाहिल्या जातात. गरजेनुसार त्यात बदल केला जातो. कोणत्या वाचकास माहिती उपयुक्त आहे हे जाणून घेतल्या जाते. हि सेवा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर देता येते.

अशाप्रकारची सेवा देण्याची काही फायदे पुढीलप्रमाणे

1) उपयोजकांना वैयक्तिकरित्या हि सेवा दिल्या जाते.
2) माहिती प्रदान येणारे प्रलेख नेमक्या वाचकास नेमकी माहिती प्राप्त करुन दिल्या जाते. म्हणून माहितीचा जास्तीतजास्त उपयोग या सेवेत होतो.
3) प्रलेखांची प्राथमिक स्वरुपात छाटणी करुन निवडक स्वरुपातील माहिती वाचकांना देण्यात येते. त्यामुळे उपयोजकांचा वेळ वाचविला जातो.
4) यामध्ये उपयोजकांना माहिती प्राप्त करण्याची कला किंवा युक्ती अवगत असल्याबाबत अपेक्षा केल्या जात नाही.
5) उपयोक्त्यांना स्वतः नविन माहितीबाबत जागरुक राहण्याची गरज असते. कारण प्रलेखक अशाप्रकारचे कार्य करु शकतात.
6) निर्देशन किंवा सारलेखन सेवेपेक्षा हि सेवा अधिक गतिमान आहे.
7) उपयोक्त्यांच्या वैयक्तिक गरजा जाणून किंवा लक्षात घेवून हि सेवा दिल्या जाते. म्हणून ती जास्तीतजास्त अपेक्षा पूर्ण करु शकते.

या सेवेमध्ये काही मर्यादा असल्याने त्यात येणाऱ्या अडचणी किंवा दोष पुढीलप्रमाणे, –

1) उपयोक्ते काही वेळा स्वतःच्या माहिती विषयक गरजा नेमकेपणाने स्पष्ट करु शकत नाही. किंवा ते त्याबाबत अ... असतात. अशावेळी त्यांना निश्चित कोणती माहिती हवी आहे हे सुद्धा ठरविता येत नाही.

2) कोणत्याही यांत्रिक पद्धतीशिवाय वाचकांच्या मागणीविषयक समाधान पद्धतशीरपणे करता येत नाही. म्हणून संगणकाच्या साहाय्याने हि सेवा दिल्या जाते.

3) वाचकांना दिलेल्या सेवेबाबत पूर्ण प्रतिसाद देण्यास अधिक... वाचक जागरुक किंवा तत्पर राहत नाही. त्यामुळे सेवेचे योग्य मूल्यमापन करता येत नाही व एकूण कार्यक्षमता कमी होते.

4) अशी सेवा देण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारीच असावे लागतात. लहान ग्रंथालयांना हि सेवा त्यांच्या वाचकांना उपलब्ध करुन करुन देता येत नाही.

निवडक माहितीच्या प्रसारणाची सेवा प्रचलीत जागरुकता सेवा यामध्ये समाविष्ट होवू शकते. एवढेच नव्हे तर निवडक माहिती प्रसारण सेवा हि प्रचलित जागरुकता सेवेचा एक भाग असतो.

Unit 1 Topic 2

## II Topic — Information Analysis —

बदलत्या काळानुसार ग्रंथालयातील वाचकांच्या गरजा सुद्धा वाढू लागला. ज्यावेळी वाचक वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीची मागणी करु लागले, त्यांची माहिती विषयक मागणी पूर्ण करण्याकरिता ग्रंथालयांना सुद्धा त्यांच्या पारंपारिक सेवा-व्यतिरिक्त नविन सेवांचा उपयोग करणे आवश्यक वाटू लागले व हि वाढत्या स्वरुपातील मागणी पूर्ण करण्याकरिता माहिती विश्लेषणाची गरज निर्माण झाली.

## माहितीची स्फोटी उत्पत्ती :-

मानवी समाजात वेळोवेळी अनेक प्रकारचे बदल आले आणि समाजाचा विकास होत गेला. त्यामधील सर्वात अलिकडील क्रांती म्हणजे माहिती तंत्रज्ञान हे होय. याचे मूलभूत कारण म्हणजे आज निरनिराळ्या क्षेत्रात निरंतर होत असलेली संशोधने आणि त्यातून तयार होत असलेले साहित्य होय. व या संशोधनातून जी साहित्य निर्मिती होते त्याला आपण माहितीचा विस्फोट असे म्हणतो. कागदाच्या शोधानंतर आणि छपाईच्या निर्माण होवू लागली आणि त्यानंतर आलेल्या माहिती छपाईने निर्माण होवू लागली आणि त्यानंतर आलेल्या वेगवेगळ्या क्रांतीमुळे त्यात अधिक भर पडत गेली त्यामुळे अशा माहितीवर नियंत्रण ठेवणे तसेच त्यांच्या एकत्रित नोंदी ठेवणे आवश्यक होवू लागले.

## इतिहास -

पारंपारिक माहिती विश्लेषण प्रक्रियांना मोठा प्राचीन इतिहास आहे. 'अलेक्झांड्रिया' ग्रंथालय येथे इ.स. २५० पूर्वी ग्रंथांची मागणी पूर्ण करण्यासाठी तालिका तयार करण्यात आल्या होत्या. आपल्याला माहिती विश्लेषणाच्या मुलभूत पायऱ्या पद्धती जाणुन घ्यायच्या आहे. या पद्धतीच्या आधारे आपल्याला माहितीच्या सागरातून नेमके मोती शोधणे सोपे जाईल. आणि उपयोगकर्त्यांना त्यांच्या कार्याकरिता त्या माहितीच्या उपयोग होईल. सुरुवातीला केवळ संशोधकांना विशिष्ट प्रकारच्या माहितीची आवश्यकता पडत होती. मात्र सीता-रामा यांच्या मतानुसार विश्लेषित माहिती हि केवळ संशोधकांना नव्हे तर वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवसायिकांना आवश्यक असते. जसे व्यवस्थापक, नियोजन कर्ते, प्रकल्प अधिकारी, शिक्षक, अभियंते इत्यादींना त्यामुळे प्रत्येक व्यवसायिकास त्याच्या दैनंदिन किंवा विशेष कार्यासाठी केव्हाही अशा प्रकारच्या माहितीची आवश्यकता पडू शकते.

## ग्रंथालयाची भूमिका -

उपलब्ध साहित्याची माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी ग्रंथालय हे उत्तम प्रकारचे साधन आहे. त्यामुळे वाचक माहितीचा शोध घेण्याकरिता ग्रंथालयाची मदत घेवू लागले. ज्यावेळी ग्रंथालयातील संग्रह किंवा प्रलेखांची संख्या कमी होवू लागली असावेळी त्यातून माहिती शोधने कठीन नव्हते. परंतु संग्रहामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ होऊ लागल्यानंतर माहिती विश्लेषणाची आवश्यकता वाढू लागली. ग्रंथालयात केवळ ग्रंथांचा संग्रह केला आणि त्यावर कुठलेही तांत्रिक प्रक्रिया केली नसल्यास अशा संग्रहातून हवी असलेली माहिती किंवा नेमका ग्रंथ शोधने कठीन कार्य आहे. त्यामुळे ग्रंथाचे किंवा प्रलेखांचे विश्लेषण करुन त्यांची ठळक वैशिष्ट्ये आणि त्यांच्या नोंदी करणे आवश्यक आहे. या नोंदी ग्रंथाच्या आतील पृष्ठावर किंवा चिठ्ठीवर केल्या जातात. त्यामुळे ग्रंथ ओळखणे सोपे जाते. अशाप्रकारे प्रत्येक प्रलेखाला त्याची ओळखप्त प्राप्त करुन दिल्यास मोठ्या ग्रंथालयातून शोधून काढणे सोपे जाते.

## माहिती विश्लेषण -

माहिती विश्लेषण ही एक प्रक्रिया आहे, ज्याचा उपयोग केवळ माहितीचा शोध घेणे एवढ्याच नाही तर संशोधन करणे सुद्धा होय. वेगवेगळ्या विचारवंतांनी माहिती विश्लेषण बद्दलची आपली स्वतंत्र मते खालील प्रमाणे सांगितलेले आहे.

डॉ. सिताराम यांच्या मतानुसार ⇒ डॉ. सिताराम यांच्या मतानुसार "माहिती विश्लेषण हे अनेक प्रक्रियेशी संलग्न आहे. त्यांच्या मते या क्रियेत कुठल्याही एका प्रक्रियेचा उल्लेख करता येणे शक्य नाही. निर्देशन करतांना सुद्धा विषय विश्लेषण केले जाते. माहिती संपर्क विषयक प्रक्रियेत मुल्यांकन केलेल्या माहिती विश्लेषणाचा उपयोग केल्या जातो. प्रलेखन प्रक्रियेकरिता उपलब्ध माहितीवर सखोल विश्लेषण करण्याची गरज असते. या प्रक्रिया सर्व साधारण ग्रंथालयात केल्या जात नाही तर

संशोधन कार्यास सहाय्यकारी होईल या दृष्टीने ग्रंथालयातील माहितीचे पद्धतशीरपणे विश्लेषण करून त्याचा उपयोग ग्रंथालयातील माहितीच्या गरजेनुसार तत्प्राप्ती करण्याकरिता होतो. परंतु हे कार्य केवळ मानवी मेंदूद्वारे उत्तम प्रकारे होऊ शकते.

Allen Kent यांनी संपादित केलेल्या विश्वकोशानुसार माहिती विश्लेषण म्हणजे असा शब्दसमूह होय की ज्याद्वारे प्रलेखाचे प्रतिनिधीक सादरीकरण केले जाते. या सादरीकरणाच्या उपयोग माहिती मिळवण्याकरिता आणि माहिती शोधण्याकरिता करता येतो. यामध्ये प्रलेखाच्या प्रकार, सारांश, तालिका नोंद, वर्गीकृत नोंद आणि निर्देश नोंद असू शकते. विस्तृतपणे सांगायचे ठरल्यास माहिती विषयक प्रक्रियेचे माहिती हस्तांतर साधन हे उपयोग करता असे होत असते.

माहिती विश्लेषण प्रक्रियेत तीन भागात विभागता येईल.

1) प्रलेखाचे विश्लेषण असा प्रकारे करणे की, ज्यामुळे त्यातील विषयक माहिती किंवा शब्दसमूह त्या प्रलेखाचे प्रतिनिधित्व करू शकेल.

2) ज्या शब्दामध्ये विश्लेषण व्यक्त करायचे आहे त्या भाषेवर नियंत्रण ठेवणे.

3) विश्लेषित केलेल्या माहितीचा शोध घेण्या योग्य माध्यमांवर नोंद करणे.

उदा- तालिकापत्र, मुद्रित निर्देश, Magnetic tape इ.

माहिती विश्लेषण म्हणजे उपलब्ध माहितीच्या प्रत्येक भागाचे असे विश्लेषण होय की, ज्याच्याआधारे माहितीच्या उपयोगकर्त्यांना आवश्यक माहिती वापरता येईल. परंतु माहिती वाचकांना सादर करतांना माहितीची विश्वसनीयता, उपयुक्तता तपासून पाहणे आवश्यक ठरेल.

२ माहिती विश्लेषणाच्या विविध पद्धती ... Method ...

## माहिती विश्लेषणाच्या पद्धती

माहिती विश्लेषण या प्रक्रियेत ग्रंथालयातील अनेक पारंपारिक तत्त्वांचा समावेश होतो. त्यात तालिकीकरण, निर्देशसारलेखन, वर्गीकरण तसेच काही आधुनिक तंत्रांचा देखील समावेश होत असतो. यामध्ये जसे स्वयंचलित निर्देशन, वर्गीकरण, सारकरण इ. तंत्रामुळे प्रलेखांची विशिष्ट संगतवार निवड करणे सहज शक्य होते. याकरिता माहिती विश्लेषणाच्या पायऱ्या किंवा पद्धती पुढीलप्रमाणे,-

1) तालिकीकरण
2) वर्गीकरण
3) निर्देशन
4) ① शब्दलेख निर्देश
   ② विषय निर्देश
4) सारलेखन
5) ग्रंथसूची
6) आशय विश्लेषण
7) विषय विश्लेषण

1 : तालिकीकरण -

एखादा मूळ लेख आणि नवीन निर्मितीमध्ये अनेक व्यक्तींचा सहभाग असतो. जसे लेखक, प्रकाशक, मुद्रक संपादक, अनुवादक इ. त्यासोबतच प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष, भाषा या गोष्टीसुद्धा लेखनाच्या महत्वाच्या मानल्या जातात. वरील सर्व माहिती तालिकेमध्ये नोंदीच्या स्वरूपात समाविष्ट होते. परंतु यापूर्वी असा प्रश्न निर्माण होतो की, कोणत्या माहितीच्या आधारे नोंद करणे सोयीस्कर जाईल. त्यानंतर निवड करतांना कोणते निकष लावणे गरजेचे आहे यामध्ये वाचकांची मागणी साधारणतः कोणत्या माहितीच्या आधारे असेल आणि या कार्याकरिता नेमका किती वेळ देता येईल. याचा विचार करून नियमानुसार तालिकीकरणासंबंधी निर्णय घेतला जातो. आणि प्रत्येक प्रलेखाची नोंद करतांना वर

सांगितलेल्या निकषानुसार विश्लेषण करून नंतरच त्या माहितीची तालिकापत्रावर मांडणी केल्या जाते.

2) वर्गीकरण –

ग्रंथालयातील वर्गीकरण म्हणजे ज्ञान किंवा विषयाचे वर्गीकरण होय. ग्रंथालयात संग्रहित केलेल्या विविध विषयावरील ग्रंथांना विभागणी करून विशिष्ट क्रमाने लावणे म्हणजे वर्गीकरण होय. या वर्गीकरणाचा मुख्य उद्देश वाचकाला कमीतकमी वेळात उपलब्ध ग्रंथ किंवा साहित्य उपलब्ध करून देता यावा हा होय. या संबंधित विषयानुसार वेगवेगळे केलेल्या ग्रंथांना वर्गीकरण पद्धतीच्या क्रमानुसार कपाटावर लावल्या जाते यामुळे ग्रंथालयातील संग्रह कितीही मोठा असला तरी नवीन येणाऱ्या ग्रंथांना त्यामध्ये सामावून घेता येते. परंतु त्याकरिता वर्गीकरण येणे गरजेचे आहे. आपल्या ग्रंथालयास उपयुक्त ठरू शकेल अशा वर्गीकरण पद्धतीची निवड केल्यानंतर संग्रहातील प्रत्येक ग्रंथाला त्या पद्धतीनुसार वर्गांक दिला जातो. आणि वर्गांकानुसार त्या ग्रंथाचे स्थान निश्चित केल्या जाते. अशाप्रकारे वर्गीकरण करतांना सुद्धा विषयाचे विश्लेषण करूनच ग्रंथांना वर्गांक निश्चित करता येतो.

3) निर्देशन –

निर्देशन हि माहिती शोध प्रक्रियेतील एक महत्वपूर्ण पायरी होय. British Institution ने Index ची व्याख्या करतांना "A systematic Guide to the Location of Words Concepts or other items a books, Periodical or other publication" म्हणजे एखादा ग्रंथ किंवा नियतकालीक किंवा प्रकाशन महील काही शब्द अथवा शब्दसमूहातील माहिती किंवा त्या शब्द समुहाविषयी माहिती शोधणे सोपे जाईल. काही शब्द, विचार आणि इतर माहिती दर्शविणारा व माहितीचे स्थान दर्शविणारा पद्धतीने लिहलेला मार्गदर्शक म्हणजे निर्देश होय. निर्देशन एखाद्या लेखातील मांडलेल्या विचारांना सूचक शब्दाद्वारे वाचकांपुढे मांडले जाते. त्यामुळे वाचकाला माहिती अवगत करायला सोयिस्कर होते. परंतु अशाप्रकारे लेखातून सूचक शब्द शोधून काढण्याकरिता लेखित त्या लेखाचे विश्लेषण करणे आवश्यक असते. जो शब्द निर्देशाकरिता निवडल्या जातात अशा शब्दाद्वारे कुठला तरी संदर्भ किंवा विचार प्रकट होणे आवश्यक आहे. त्या करिता प्रत्येक विचाराला योग्य शब्दाद्वारे वाचकांपुढे आणण्या करिता विश्लेषणाची आवश्यकता आहे. म्हणुन असे म्हणता येईल की निर्देशन हि सुद्धा माहिती विश्लेषणाची एक पद्धती म्हटल्या जाते किंवा गणल्या जाते.

निर्देशाचे प्रकार

1) ग्रंथ निर्देश
2) नियतकालीक निर्देश
3) उल्लेख्य निर्देश
4) संग्रहीत निर्देश
5) विषय निर्देश

वरील विविध निर्देश तयार करण्याकरिता वेगवेगळी तंत्र वापरली जातात. परंतु त्यांचा उद्देश मात्र एकच असतो.

उल्लेख्य निर्देश :– उल्लेख्य निर्देश हा वरील निर्देशापेक्षा थोडा वेगळा आहे. ज्याची संकल्पना E.G. युजीन गारफिल्ड यांनी प्रथम प्रचारात आणली या पद्धतीत विशिष्ट विषयामध्ये किती लेखकांनी लेखन केले आहे आणि किती ग्रंथ प्रकाशित झाले आहे तसेच ग्रंथ किंवा लेख लिहतांना आधारची कोणत्या ग्रंथांचे संदर्भ घेण्यात आलेले आहे सोबतच कोणकोणत्या लेखकांच्या लेखनाचा समावेश केलेला आहे हे सर्व कालखंडानुसार लिहल्या जाते. त्यामुळे एखाद्या संशोधकाला विशिष्ट कालावधीत त्या विषयाशी वाद किंवा बदल कसे होत गेले यांविषयी माहिती मि

4) सारलेखन / सारकरण

सारकरणाकरिता Allen Kent यांनी नऊ कारणे सांगितलेली आहे. त्यापैकी काही ठळक पुढीलप्रमाणे,—

1) सार नियतकालिकामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयातील संशोधकांना जगातील विविध भागांमधून प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमधील लेख एकाच ठिकाणी वाचायला मिळतात.

2) प्रकाशित होणारी सर्व प्रकाशने एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे सार नियतकालिके त्याकरिता सुद्धा योग्य पर्याय आहे.

3) सार वाचण्याकरिता मूळ प्रलेखापेक्षा केव्हाही कमीच वेळ लागतो.

शब्दकोशामध्ये Abstract या शब्दाचा अर्थ सार आणि सारांश असा दिलेला आहे. एखादी मोठी माहिती किंवा घटना विश्लेषण करून थोडक्यामध्ये ठळक वैशिष्ट्यांसहित लिहल्या जाते. त्यामध्ये प्रलेखाचे सार करतांना मूळ प्रलेखातील गाभा वाचकांसमोर मांडल्या जातो. त्यामुळे वाचकांना मूळ प्रलेखात कोणता विषय दिलेला आहे किंवा मांडला आहे त्याकरिता कोणती पद्धती वापरलेली आहे याकरिता माहिती मिळते. यावरून तो प्रलेख महत्वाचा म्हणजेच कामाचा आहे किंवा नाही हे ठरविल्या जातो.

वर सांगितलेल्या प्रमाणे सारकरण प्रक्रियेत संपूर्ण प्रलेखाचे प्रथम वाचन केल्या जाते त्यानंतर त्याचे विश्लेषण करून सार लिहिले जाते. साराचे प्रकार पुढीलप्रमाणे,—

1) निर्देशात्मक सार (Indicative Abstract)
2) माहितीपूर्ण सार (Informative Abstract)
3) टिकात्मक सार (Critical Abstract)
4) स्वयंम सार (Auto Abstract
5) शीर्षकाधारित सार (Titler Abstract)

खालील प्रकारमधील Informative Abstract वाचकांना मूळ प्रलेखातील ठळक वैशिष्ट्ये विशद करतो. तर Indicative Abstract यामध्ये मूळ प्रलेखाची फक्त संकल्पना सांगितल्या जाते (अशाप्रकारे सारांच्या प्रकारानुसार दिलेल्या प्रलेखाचे विश्लेषण करणे आवश्यक असते. किंवा असे सुद्धा म्हणता येईल की, सारलेखन हा सुद्धा विश्लेषणाचा एक भाग आहे.)

5) Bibliography — ग्रंथसूची म्हणजे ग्रंथांची विशिष्ट क्रमाने विषयानुसार केलेली व्यवस्थित यादी होय. ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांकरिता त्यांनी मागणी केल्यास किंवा त्यांच्या अपेक्षेनुसार तयार केल्या जातो. याप्रकारचे कार्य ग्रंथालयातील संदर्भ विभागातील कर्मचाऱ्यांद्वारे केल्या जाते. या व्यतिरिक्त ग्रंथसूचीचे सुद्धा काही प्रकार आहेत. त्यामध्ये ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, विस्तृत, राष्ट्रीय, प्रादेशिक, स्थानिक, विषय, लेखक इ. याठिकाणी आपण फक्त ग्रंथसूची तयार करतांना माहितीचे विश्लेषण कसे केल्या जाते ते पाहणार आहोत. (ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना जर त्यांच्या विषयातील उपलब्ध प्रलेखांची यादी करून दिली तर त्या वाचकास उपयुक्त ठरते) त्यामुळे ग्रंथसूची तयार करणे महत्वाचे कार्य मानल्या जाते. ग्रंथसूची तयार करतांना ग्रंथपाल ज्या विषयाची सूची तयार करावयाची आहे त्या विषयातील तज्ञांशी संपर्क चर्चा करून वाचकांची विषय सूची तयार केल्या जाते. आणि त्या वाचकांचे दाखिल विषयाची व्याप्ती, व्याख्या, भाषा, प्रकाशन साहित्याचा प्रकार इ. माहिती विषयी चर्चा केल्या जाते. त्याप्रमाणे ग्रंथसूचीचा आराखडा तयार करता येतो. यानंतर नोंदीचा प्रकार, रचना त्यातील माहिती विषयी आढावा घेऊन नंतरच ग्रंथपाल ग्रंथसूची तयार करतो. अशाप्रकारे ग्रंथसूची तयार करतांना सुरुवातीला विषयाची माहिती मिळवून यादी तयार केली जाते.

## आशय विश्लेषण Content Analysis

आशय विश्लेषण हे वाचणे, बघणे किंवा ऐकणे या क्रियात्मकेच मूळ आहे. आशय विश्लेषणाची प्रक्रिया पूर्वीसुद्धा होत होती परंतु आशय विश्लेषण हे नाव पेपर्यात त्या संकल्पनेला मिळालेले आहे. या प्रक्रियेत एखादी घटना माहितीविषयक संदेश, विचार, प्रसंग इ. चे सारांश तयार करून सांगितल्या जाते. म्हणजे आशय विश्लेषणाचा उपयोग संप्रेषणाकरिता केला जातो. Mitchell यांच्या नुसार आशय विश्लेषण तीन तथ्यात कोणते संप्रेषण होय.

1) संदेश पाठविणारे आपले वेगवेगळे उद्देश पूर्ण करण्याकरिता संप्रेषण करित असतात. व ते संदेश मिळविणाऱ्याला देत असतात.

2) या संदेशाचे एखाद्यांवर, ऐकणाऱ्यांवर वेगवेगळे परिणाम होऊ शकतात.

3) आशय विश्लेषणात निष्कर्षावर अधिक भर दिला जातो.

गुड आणि हॅट यांच्या मते, आशय विश्लेषण हे आशयाच्या गुणधर्माचे विश्लेषण आहे. विषयानुसार आशयाचे विश्लेषण करायचे असल्यास आशयाचे राजकीय, सुधारात्मक, शुद्ध, सामाजिक, तार्किक, संशोधनपर किंवा मनोरंजक असे वर्गीकरण करता येते यालाच आशयाचे गुणधर्मानुसार विश्लेषण म्हणतात. ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचा विचार केल्यास ग्रंथालय त्यांच्या कार्यामध्ये प्रत्येक पातळीवर या संज्ञांचा उपयोग करतात. जसे ग्रंथ निवड, ग्रंथ खरेदी, वर्गीकरण, तालिकीकरण, निर्देशन इ. वरील क्रियांमध्ये सुरुवातीला त्या लेख्यातील आशयाचे म्हणजेच वि विषयाचे विश्लेषण करून पुढील तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्या जाते. म्हणून आशय विश्लेषण ला सुद्धा माहिती विश्लेषणाचा एक भाग होय असे म्हणता येईल.

## विषय विश्लेषण –

एखाद्या लेख्याचे जेव्हा वर्गीकरण केल्या जाते त्या वेळेस त्याला लेख्यातील ग्रंथसूचीय घटकांच्या आधारे प्रथम ओळख प्राप्त करून दिल्या जाते. त्यानंतर तालिकेत त्याची नोंद केल्या जाते. परंतु त्याच लेख्यास ओळखण्याकरिता त्याचा विषय, शीर्षक व वरील वाचकांच्या दृष्टीने पुरेसे ठरू शकत नाही. म्हणून विषय विश्लेषण हे निव्वळ तालिकीकरणापेक्षा भिन्न आहे. कारण, तालिकीकरण करतांना लेख्याची वैशिष्ट्ये नमुद केल्या जाते. जसे लेखक, प्रकाशक इत्यादी. परंतु लेख्यातील निर्देश तयार करतांना वाचकांच्या मागणीचा विचार होणे आवश्यक आहे. म्हणून लेख्याचे विश्लेषण करतांना वाचकांच्या वेगवेगळ्या मागणीनुसार वेगवेगळ्या प्रकारे केल्या जाते. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या विषयाची मागणी करतांना वाचकांची मागणी व गरज विचारात घेतली जाते. आणि नंतर त्याच्या आधारे निर्देश तयार केले जातात. म्हणजे प्रत्येक वेळेस एकाच लेख्यासाठी केलेले विषय विश्लेषण हे सारखेच असेल असे नाही, त्याला ते वाचकांच्या मागणीनुसार भिन्न राहते. त्याकरिता संपूर्ण लेख्याचा सुरुवातीला अभ्यास करावा व त्या वाचकांकरिता विश्लेषण केले जावे आणि त्यानुसार त्याचे विषय विश्लेषण तयार होतील. कारण विषय विश्लेषण केल्यानंतर त्याचा परिणाम म्हणजे सार, सारांश, निर्देश, वर्गांक इ. होय.